# मेट्रो ३ : एमएमआरसीएलतर्फे विविध स्पर्धांचे आयोजन

**मुंबई** : मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या वतीने मुंबई मेट्रो मार्ग-३ साठी मॅस्कॉट आणि जिंगल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा सर्वांसाठी खुली असून, १ ते ३० जून या कालावधीत एमएमआरसीएलच्या अधिकृत संकेतस्थळावर सुरू होणार आहे. स्पर्धकांना ऑनलाइन प्रवेशिका दाखल करता येणार आहे. मॅस्कॉट आणि जिंगल दोन्ही स्पर्धांच्या प्रवेशिका एमएमआरसीएलच्या अधिकृत संकेतस्थळाद्वारेच (वेबसाइट) स्वीकारल्या जाणार आहेत. इच्छुक स्पर्धकांना नाव, संपर्क तपशील आणि नोंदी संकेतस्थळावर नमूद करता येणार आहे. अधिक तपशीलवार नियमावली संकेतस्थळावर आहे.

दोन्ही स्पर्धांचे निकाल एमएमआरसीएलच्या अधिकृत सोशल मीडिया हँडल, तसेच संकेतस्थळावर जाहीर होणार आहे. नागरिकांनी जास्तीत जास्त संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन एमएमआरसीएलने केले आहे.

एमएमआरसीएलच्या माध्यमातून राज्यातील पहिल्या व सर्वात लांब ३३.५ किमी असलेल्या भूमिगत (कुलाबा-वांद्रे-सीप्झ) मुंबई मेट्रो-३ मार्गाचे काम पूर्ण करण्यात येत आहे. या मार्गातील २६ स्थानके भूमिगत तर एक स्थानक जमिनीलगत असणार आहे. उपनगरीय रेल्वेने न जोडलेल्या भागांनाही या मार्गामुळे जोडणी मिळणार असल्याने मुंबई शहराला मेट्रो-३ च्या रुपात प्रवासाचा उत्तम पर्याय उपलब्ध होणार आहे.